Navprabha, Monday 22 July 2019

# मयेतील शेतकऱ्यांना सेंद्रीय खताविषयी माहिती

मोर्ले (न. वा.)

भारत हा कृषिप्रधान देश आहे. गोव्यात शेती हा मुख्य व्यवसाय आहे. पण काही ठिकाणी शेतकऱ्यांनी शेतीकडे पाठ फिरवली आहे. शेतीचे नवे तंत्रज्ञान वापरूनही अनेक शेतकरी शेती करतात. शेतीविषयी नवीन तंत्रज्ञान शिकविण्यासाठी सुळकर्णे येथील डॉन बॉस्को कॉलेज ऑफ अॅग्रीकल्चरतर्फे विद्यार्थ्यांचा एक गट आपल्या ग्रामीण कृषी कार्यानुभव अंतर्गत कार्य करत आहे. सेंद्रिय खत वापरावर त्यांनी जास्त भर दिला आहे. सेंद्रिय शेती ही खूप म हत्त्वाची असल्याने ते हे कार्य करीत आहेत. मये तिखाजण येथील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणारा कार्यक्रम नुकताच यावेळी घेणयात आला.

शेतीला अनेक प्रकारच्या रोगांचा प्रादुर्भाव होतो. व उत्पन्न कमी येते तर कधी कधी येतच नाही. त्यामुळे रोग नियंत्रणावर शेतकऱ्यांना त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी मिठाच्या पाण्यात (३ टक्के) बिया घालून त्यामध्ये तरंगलेल्या बिया रोगाच्या असतात त्या वापरायच्या नसतात व खाली राहिलेल्या लावण्यासाठी वापरायच्या असे सांगितले. त्यांना या उपचाराचे महत्त्व पटवून दिले. तसेच दापोग नर्सरी कशी करायची, त्याचे फायदे सांगितले.



मये – तिखाजण येथे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना डॉन बॉस्को कॉलेज ऑफ अॅग्रीकल्चरचे विद्यार्थी. (छाया – सुजाता मयेकर)